# मराठी (MARATHI)
# ( 204 )
## चाचणी क्रमांक - 1
## ( धडा एका पासून बारा पर्यंत )

एकूण गुण : 25

**सूचना :** (i) सर्व प्रश्नांची उत्तरे लिहिणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्नाचे गुण समान आहेत.

(ii) उत्तरपत्रिकेच्या पहिल्या पृष्ठावर वरच्या बाजूस आपले नाव, अनुक्रमांक, अभ्यास केंद्राचे नाव, विषय इत्यादी माहिती स्पष्ट शब्दांत लिहावी.

1. खालीलपैकी कोणत्याही **तीन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 60-80 शब्दांत लिहा : 5

(क) भाषेची अभिवृद्धी कशावर अवलंबून असते?

(ख) कन्याकुमारीला सागराकडे पाहताना लेखकाच्या मनात कोणते विचार झाले?

(ग) बोणं म्हणये काय? ते कशासाठी शिजविले जाते?

2. खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 60-80 शब्दांत लिहा : 5

(क) 'ग्राममाता व्हा' असा संदेश लेखकाने स्त्रियांनां का दिला आहे?

(ख) 'एका तळ्यात होती' या कवितेची वैशिष्टये वर्णन करा.

(ग) 'झेल्या' या कथेतील शिक्षकाचा जीवनक्रम कसा होता?

3. 'झोप' या कथेतील चोराच्या प्रसंगामधील विनोद आणि नाटय स्पष्ट करा. 5

किंवा

''हा तिमिर घोर संहारीन'', ''करि दिव्य पताका घेऊ'' आणि ''भाग्यसूर्य तळपत राहो'' या काव्यपंक्तींमधील अर्थ स्पष्ट करा

4. 'सागरास' या कवितेतील भाववृत्तीचे स्वरूप तुमच्या शब्दांत सांगा. 5

किंवा

समर्थ रामदासांनी संभाजी राजांना पत्रातून केलेला उपदेश थोडक्यात वर्णन करा.

5. बालकवींची 'फुलराणी' ही कविता मिळवून वाचा आणि त्यातील कहाणी तुमच्या शब्दांत लिहून काढा. 5

# मराठी (MARATHI)

## ( 204 )

## चाचणी क्रमांक - 2

## ( धड़ा पंधरा पासून चोबीस पर्यंत )

एकूण गुण : 25

**सूचना :** (i) सर्व प्रश्नांची उत्तरे लिहिणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्नाचे गुण समान आहेत.

(ii) उत्तरपत्रिकेच्या पहिल्या पृष्ठावर वरच्या बाजूस आपले नाव, अनुक्रमांक, अभ्यास केंद्राचे नाव, विषय इत्यादी माहिती स्पष्ट शब्दांत लिहावी.

1. पुढीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 60 ते 80 शब्दांत लिहा : 5

(क) 'संतवाणी' मधून कोणत्या नीतिमूल्यांची शिकवण मिळते, ते सांगा.

(ख) 'पहा टाकले पुसुनी डोळे' या कवितेतीळ भावना स्पष्ट करा.

(ग) 'या जगण्यावर शतदा प्रेम करावे' या कवितेच्या रचनाकृतीचे वर्णन करा.

2. पुढीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे द्या : 5

(क) "'श्री' काढता येऊ लागल्या बरोबर घोरपडीच्या मदतीने एखादा सिंहगड चढल्याचा आनंद मराठी मुलाला होतो." या वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.

(ख) 'दूरदृष्टीचे अध्यापक व वैज्ञानिक' या पाठाच्या सुरूवातीलाच उद्धत केलेल्या जर्मन कवी गटे याच्या विधानाचे मर्म स्पष्ट करा.

(ग) 'पाठ फिरवणे', 'हौस पुरवणे', 'होस फिटणे' या वाक्प्रचारांचे अर्थ सांगून त्यांचा वाक्यांत उपयागे करा.

3. 'पर्वतशिखर' या पाठाच्या आधारे डॉ॰ केशव हेडगेवार यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करा. 5

किंवा

"उठतात तमावर त्याची पाउल चिन्हे" या ओळीतील आशयाचे स्पष्टीकरण करा.

4. महर्षी कर्वे यांना देण्यात आलेली 'भारत रत्न' ही अत्युच्च श्रेष्ठ पदवी कशी समर्पक आहे, ते सांगा. 5

किंवा

लक्ष्मीबाई टिळकांच्या कामवालीच्या स्वभावाचा परिचय करून द्या.

5. महाराष्ट्रातील संतांच्या विषयी माहिती मिळवून त्यांची नावे, त्यांच्या चरित्राविषयीची माहिती आणि त्यांची काव्यरचना यांविषयी एक मुद्देसूद टाचण तयार करा. 5

# मराठी (MARATHI)

## ( 204 )

## चाचणी क्रमांक - 3

## ( धडा पंचवीस पासून चऊतीस पर्यंत )

एकूण गुण : 25

**सूचना :** (i) सर्व प्रश्नांची उत्तरे लिहिणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्नाचे गुण समान आहेत.

(ii) उत्तरपत्रिकेच्या पहिल्या पृष्ठावर वरच्या बाजूस आपले नाव, अनुक्रमांक, अभ्यास केंद्राचे नाव, विषय इत्यादी माहिती स्पष्ट शब्दांत लिहावी.

1. पुढील पैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे द्या :- 5

(क) संभाषण म्हणजे काय? त्साची काही वैशिष्टये सांगा.

(ख) बातमी कोणत्या घटनेची होऊ शकते?

(ग) एका गृहिणीने सकाळची न्याहरी, दुपारचे जेवण आणि रात्रीचे जेवण यांच्या करिता आठवडाभराचे वेळापत्रक करावयाचे ठरविले या वेळापत्रकासाठी तालिका तयार करा.

2. पुढील पैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे द्या :- 5

(क) शब्दकोशात समाविष्ट करण्यासाठी पुढीळ शब्द वर्णक्रमानुसार लिहा :
गडवा, गॅलरी, वानर, वॉर्निश, चॅलेंज, कॉठ, कमळ, कॅलेंडर, चमत्कार, काळ, बावळट, बॉल

(ख) आभार प्रदर्शनाच्या भाषणात कोणाकोणाचे व कोणत्या क्रमाने आभार मानावेत?

(ग) पुढीलपैकी समानार्थी शब्दांच्या जोड्या लावा :
वृक्ष, खटका, भाऊ, वृंद, प्रासाद, भ्राता, जथा, झाड, केस, झिपऱ्या, वाद, घर

3. 'आरोग्याचे महत्व' या विषयावर विचार प्रधान निबंध लिहा. 5

किंवा

'मला देव प्रसन्न झाला तर -' या विषयावर कल्पना प्रधान निबंध लिहा.

4. तुमच्या आजारी आईच्या सेवेसाठी एका परिचारिकेची आवश्यकता आहे. 5
अशी व्यवस्था होऊ शकेल का, याची चौकशी करण्यासाठी रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांना पत्र लिहा.

किंवा

तुम्ही घरी सुखरूप पोचलात आणि तुमचा प्रवास चांगला झाला, हे कळविण्यासाठी तुमच्या मित्राला पत्र लिहा.

5. तुमच्या परिसरातील लोकांना पाणी, स्वच्छता आणि आरोग्य यांविषयी कोणकोणत्या अडचणी आहेत, त्याने सर्वेक्षण करून पुढील प्रमाणे तक्ता बनवा. 5

| क्रमांक | व्यक्तीचे नाव<br>व<br>वय | व्यवसाय | अडचणी |
|---|---|---|---|
| | | | |